GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र शासन
DIRECTORATE OF INDUSTRIES
उद्योग संचालनालय
GENERAL MANAGER, DISTRICT INDUSTRIES CENTRE
कार्यालय, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद

जा. क्र. जिउकेंऔ/जिनिप्रस/इतिवृत्त/2021/ दिनांक

विषय :- मा. श्री. डॉ. अनंत गव्हाणे, अप्पर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हा निर्यात प्रचालन समितीच्या दि. ३१.०८.२०२१ रोजी पार पडलेल्या बैठकीचे इतिवृतांत.

उपस्थित अधिकारी/कर्मचारी – सोबत जोडलेल्या हजेरीपटाप्रमाणे सर्व अधिकारी उपस्थित होते.

सर्वप्रथम सचिव तथा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेला सुरुवात केली. सदर बैठकीमध्ये मा. अप्पर जिल्हाधिकारी महोदयांकडून खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आले.

| अ क्र | विषय | मा. अप्पर जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या सूचना | कार्यवाही करणारा विभाग | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे. | मागील दि. २३.१२.२०२० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मा. महाव्यवस्थापक, श्री. दीपक शिवदास यांनी वाचून दाखवले. सर्वानुमते इतिवृत्त कायम करण्यात आले. | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद | १५ दिवस |
| २. | जिल्ह्यात होत असलेल्या निर्यातीच्या बाबत संकलित केलेल्या माहितीवर चर्चा करणे. | सचिव तथा महाव्यवस्थापक, श्री. दिपक शिवदास यांनी केंद्र शासनाच्या Custom विभागाकडून जिल्ह्यातून होणाऱ्या Export बाबत माहिती प्राप्त करून तसेच औद्योगिक संघटनेच्या मदतीने Export Action Plan बाबत सविस्तर प्राप्त झालेली माहिती संकलीत करून समिती समोर ठेवण्यात आली. | | |
| ३. | जिल्हा निर्यातचा आराखड्यावर सविस्तर चर्चा करणे. | District Export Action Plan बाबत सविस्तर चर्चा झाली. या चर्चेदरम्यान Confederation of Indian Industries, Aurangabad चे उपाध्यक्ष श्री. अमोल मोहिते यांनी Export Action Plan मधील मुद्दा क्र. १.५ मध्ये Logistic Infrastructure मध्ये Warehouse असावे, असे सुचविले. चर्चेदरम्यान समितीने Export Action Plan मधील मुद्दा क. १.७ | | |



Scanned with CamScanner

ग्र

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
महाराष्ट्र शासन
**DIRECTORATE OF INDUSTRIES**
उद्योग संचालनालय
**GENERAL MANAGER, DISTRICT INDUSTRIES CENTRE**
कार्यालय, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | मध्ये Industrial Profile मध्ये Employment Generation या Table मध्ये Mega Units ची माहिती असावी, असे सुचविले. समितीने Export Action Plan मधील मुद्दा क्र. २.४ मध्ये Mega Unit या Table मध्ये समाविष्ट न करण्यात आलेले Jolly Board Ltd, Shendra, Bonatrans India Pvt. Ltd., Shendra, Perkins India Pvt. Ltd., Chikalthana, Radico NV Distilleries Maharshtra Ltd., Shendra, Coatall Films Pvt. Ltd., Shendra या Mega Units चा समावेश करण्याबाबत सुचविले. | | |
| ४. | जिल्ह्यात निर्यात वाढीबाबत व त्या अनुषंगाने आवश्यक मुलभूत सुविधाबाबत चर्चा करणे. | Chamber of Marathwada Industries and Agriculture, Aurangabad चे सचिव श्री सतीश लोणीकर, यांनी Export बाबतीत Empty Containor Availabilty Major Issue असल्याचे सांगितले. Confederation of Indian Industries, Aurangabad चे उपाध्यक्ष श्री. अमोल मोहिते यांनी Logistic Infrastructure मध्ये Warehouse असावे, असे सुचविले. Transport बाबत मा. डॉ. अनंत गव्हाणे, अप्पर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी औरंगाबाद-शिर्डी महामार्ग व मुंबई-नागपूर बुलेट ट्रेन प्रस्तावित असल्याचे सांगितले. | | |
| ५. | जिल्हा निर्यात आराखड्यास अंतिम मंजुरीसाठी चर्चा करणे. | समितीने जिल्हा निर्यात आराखड्याबाबत सविस्तर चर्चा उपरोक्त बाबींचा समावेश करून तत्वतः अंतिम मंजुरी दिली. | | |

सचिव तथा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद यांनी उपस्थित असलेल्या सर्व उपस्थितांचे आभार मानले व मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपन्न झाली असे जाहीर केले.

Shivdas
08.09.21
(दिपक शिवदास)
सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती
तथा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
औरंगाबाद

(डॉ. अनंत गव्हाणे)
अध्यक्ष, जिल्हा निर्यात प्रचालन समिती
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
औरंगाबाद



Scanned with CamScanner